IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# ज्ञानेश्वरीतील निसर्ग आणि पर्यावरण

**डॉ. भारती खापेकर**

सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,

धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर

**सारांश**

सध्याचे युग विज्ञान तंत्रज्ञानाचे युग आहे. आज प्रत्येक क्षेत्रात मानवाने प्रगती केली आहे हे जरी खरे असले तरी मानव हा संशोधक होता निसर्गाचा स्वत:च्या उपयोगासाठी मानवाने वापर केला. चंद्र, सूर्य, तारे, झाडे, झुडपे निसर्गातील विविध रंग, नदी, समुद्र, डोंगर ह्यांचे आकर्षण मानवाला आहे. पण आज पृथ्वीचा समतोल ढासळल्यामुळे पर्यावरणाची समस्या जाणवत आहे. निसर्गामध्ये खूप उलथापालथ होत आहे. माणूस निसर्गावर विजय मिळविण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळे सर्व सजीवांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. पर्यावरण ही मानवाच्या सांस्कृतीक, आर्थिक क्षेत्राशी निगडीत समस्या आहे. ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरी मध्ये अनेक निसर्गप्रतिमा आलेल्या आहे. पर्यावरणाचा ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीशी जवळचा संबंध आहे.

**मुळशब्द : पर्यावरण, साहित्य, निसर्ग, ज्ञानेश्वरी**

## पर्यावरण आणि साहित्य

कोणताही सजीव जीव निर्माण होणे, वाढणे, नाश पावणे या सर्व नैसर्गिक क्रिया सतत घडत असतात. या क्रिया पूर्ण होण्यासाठी ज्या घटकांची गरज भासते त्याला पर्यावरण म्हणावे लागेल.

"ही सभोवतालची परिस्थिती एक किंवा अनेक घटक मिळून तयार होत असते हे सर्व घटक एकमेकांवर परिणाम करीत असतात. असे सजीव तसेच निर्जीव घटक एकत्र येऊन जी प्रक्रिया होते तिला पर्यावरण निर्मिती म्हटले जाते."[1] सजीवांचे पृथ्वीवरील अस्तित्व निसर्ग नियमांनी बध्द अशा संतुलित परिस्थितीवर अवलंबून आहे म्हणून नोबेल यांच्या मते "पर्यावरण शास्त्र म्हणजे विविध परिसंस्था प्रणालिचे परस्पर सबंधातील संतुलन मूलकत्वाचे शास्त्रीय अध्ययन होय."[2] तसेच निसर्ग आणि मानव यांचे नाते खूप जवळचे आहे. "आपल्या आजुबाजुला असलेल्या डोंगरदऱ्याचे, पर्वत शिखरांचे, पर्वत रांगाचे, मैदानी आणि पठारी प्रदेशाचे प्रत्येकाला आकर्षण असते इतक्या मोठ्या

प्रमाणात ही भूरूपे कशी तयार झाली असावीत. लाखो करोडो वर्षे ती या भूपृष्ठावर कशी टिकून राहतात असे अनेक प्रश्न अनेकांच्या मनात असतात."[3] असा पर्यावरणाचा आणि मानवाचा संबंध आहे. आज माणसाला पर्यावरणाची समस्या भेडसावत आहे याचा परिणाम समाजावर होतो.

मानव समुहाने राहणारा आहे त्यातूनच त्याची संस्कृती निर्माण हाते, "मानवी समाजाची दृकगोचर होणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती आणि डोळ्यांना न दिसणारी पण विचारांना, अनुभवांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती होय."[4] संस्कृतीची दोन अंगे आहेत एक म्हणजे भौतिक आणि दुसरी म्हणजे आध्यात्मिक. मानसाचा विकास, त्याची उत्क्रांती, वाटचाल यामुळे मानवी जीवन संमृध्द होत असते याचा साक्षिदार निसर्गातील पर्यावरण असते. मानव शरीर आणि मन हे दोन्ही संमृध्द करीत असतो यातूनच सण,
चालिरीती, प्रथा, रूढी, परंपरा निर्माण होतात. भोषेची निर्मीती मानवाने केली आहे. "अनुभव प्रगटीकरणाचे माध्यम आणि साधन हे भाषारूप असते. म्हणून साहित्य आणि संस्कृती याचा संबंध हा अनोन्याश्रयी असा संबंध आहे. त्या समाजाचा, संस्कृतीचा घटक म्हणून लेखक साहित्यनिर्मिती करतो."[5] संगीत, नृत्य, चित्र, शिल्प, साहित्य या कला निसर्गाचे अवलोकन करून मानवाने निर्माण केल्या.

लेखक आपल्या सांस्कृतिक संचिताला धरून साहित्यनिर्मिती करतो. संतसाहित्य हे मुल्यात्मक साहित्य असून त्यामध्ये तत्कालिन समाजाचे तसेच पर्यावरणाचे प्रतिबिंब पडले आहे. "संतांना लोकोध्दाराची अत्यंत तळमळ असल्यामुळे त्यांनी लोक जीवनाच्या सर्व स्तराचे बारकाईने निरीक्षण केले होते. संतांची दृष्टी प्राधान्याने पारमार्थिक असली तरी लोकांची अधिभौतिक दु:खेही त्यांनी सहानुभूतीने न्याहाळण्याचा प्रयत्न केलेला दिसतो तसेच आपले अनुभव आपले विचार हे समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहचवावे हा संतांचा आग्रह होता. या आग्रहापोटी त्यांनी लोक मानसावर प्रभाव पाडणाऱ्या लोकप्रचलित लोकप्रिय अशा माध्यमांचा अंगिकार केला आणि त्या माध्यमातून आपला संदेश प्रवाहित करण्याचा उपक्रम सतत चालू ठेवला. त्रैवणिकांना ज्ञानापासून वंचित करणाऱ्या संस्कृत भाषेला सारून आणि त्यातील सत्वांश मात्र स्वीकारून देशी भाषातून आपले विचार मांडण्याची बंडखोरी तर संत चळवळीच्या प्रारंभापासून दिसते."[6]

संत हे नीतीमान, विवेकनिष्ठ होते म्हणून समाजाने त्यांना स्वीकारले तसेच त्यांना आध्यात्मिक लोकशाही निर्माण करून समाजाला प्रबोधन केले जीवनमूल्ये आणि मानवीमू्ल्ये यातून संतांची एक संस्कृती बनली "तिचे ठळक उदाहरण म्हणजे आजही आषाढी कार्तिकीला लाखो वारकरी विठु माझा लेकुरवाळा याला उराउरी भेटण्यासाठी पंढरपूर येथे जमत असतात. सांस्कतिक पर्यावरणाचा सुंदर आविष्कार म्हणजे पंढरीची वारी होय."[7]

**ज्ञानेश्वरीतील निसर्ग पर्यावरण**

ज्ञानेश्वरांनी निसर्गाच्या पर्यावरणात्मक स्वरूपात चैतन्यतत्व शोधले आहे. "निसर्ग आणि माणूस यांच्यातील देवाणघेवाण या पर्यावरणाला फलदायी ठरत असते या आदानप्रदानातून माणसाला आणि पर्यावरणालाही पूर्णत: मुक्त होता येत नाही असे त्याचे संबंध गुंतागुंतीचे आहे. याचे भान संतकवींमध्ये ज्ञानदेवांच्या ठिकाणी पुरेपुर असलेले दिसते. म्हणून त्यांनी भगवदगीता निरूपणासाठी स्वीकारूनही तिला स्वतंत्र रूपबंध तर दिलाच पण तिचे नाते स्वकालीन संस्कृतीशी आणि पर्यावरणाशी अत्यंत हळूवारपणे जोडून घेतले. विषय निरूपण, आध्यात्म आणि तत्वज्ञानाचे असले तरी ज्ञानेश्वरीची संरचना मात्र प्रवचन, कीर्तनाची, वाग्यज्ञाची, धर्मकीर्तनाची, देशीकार लेण्याची अशी त्यांनी स्व-तंत्र आणि स्वतंत्र केली आहे. लोक परंपरांना आत्मसात करून त्यांनी तत्कालिन सांस्कतिक वैशिष्ट्यांना अधोरेखित केले आहे. वकृत्व शैलीने एक शांतिकथा उलगडून दाखविली आहे. इतकेच नव्हे तर युध्दकलेचे रूपांतर शांतिकथेत करण्यात ज्ञानदेव यशश्वी ठरले आहे. ज्ञानेश्वरीच्या रूपाने ज्ञानदेवांनी एक 'देशीवाण' समाजासमोर व लोक समुहासमोर ठेवले आहे."[8]

ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीमधील श्रोता हा तळागाळातील आहे तसेच त्यानी मराठी भाषेचा गौरव केला आणि तत्वज्ञान आध्यात्म आणि सहवस्तुमिमांसा पचविण्याचे सामर्थ प्राप्त करून दिले. भौतिक जीवनातील आणि व्यावहारिक जीवनातील उपमा, दृष्टांन्त, प्रतिमा, प्रतिके यांच नाते निसर्गाशी जोडले. तसेच निसर्गाच्या सानिध्यात तो जीवन जगत होता. पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश ही पंचमहाभूते व्दैत नसून अव्दैत आहे. असे म्हणून चिदविलासवादाला महत्व दिले. जग हे आसिकी वस्तुप्रभा अशी त्या अनन्य वस्तुची प्रभा म्हणजे सुंदर सृष्टी आहे. निसर्ग आणि मानव याचे सुंदर नाते ज्ञानेश्वरीत आहे. ज्ञानेश्वरीतील निसर्ग कोमल रूप घेऊन येतो. निसर्ग आणि मानव यांच्या नात्यातील अव्दैत ज्ञानदेवांच्या साहित्यात आहे.

"ज्ञानेश्वरीतून ज्ञानदेवांना भोवतालचे वास्तव पर्यावरण सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक चलनवलन याच्या आधारे मोक्ष सुखाची वाट भक्ती विचारांच्या अंगाने ज्ञानदेवांना करावयाची आहे. निसर्ग आणि मानव यांचे अतुट नाते त्यांना अभिप्रेत आहे. ज्ञानेश्वरीतील निसर्ग बाहेरून लादलेला नाही तर आत्मस्वरूपाचा आविष्कार निसर्गाच्या विप्रलंभातून साक्षात्कार रूपाने ज्ञानदेवांना जानवतो."[9] निसर्गाचे भव्यदिव्य रूप ज्ञानेश्वरीत येते तसेच निसर्गाचे मृदू मुलायम कोमल रूपही येते. ऋतूचंद्र, डोंगरदऱ्या, पंचमहाभूते, वृक्षवेली यातून ज्ञानदेवांनी मानव आणि निसर्ग यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला आहे. निसर्गासोबत ज्ञानेश्वरीत ग्रामजीवन कृषीसंस्कृती, ग्रामसंस्कृती येते. "कवीची ही अपरासृष्टी आणि भौतिकातील व्यावहारिक सृष्टी यातील संवेदना म्हणजे ज्ञानेश्वरीतील पर्यावरणात्मक अनुभूती होत."[10] निसर्गातील भव्यदिव्यत्व ज्ञानदेवांना जाणवते चैतन्याचा साक्षात्कार होतो. आत्मरूपाचे विराट दर्शनही त्यांना निसर्गातूनच घडते, तसेच त्यातील अतिद्रिय, अगोचर, अलौकिक गृह्य ज्ञानदेवांना लौकिक वाटते

"वाचे बरवे कवित्व । कवित्वि बरवे रसिकत्व
रसिकत्वे परतत्व । स्पर्शु जैसा ।।"[11] ¼ज्ञानेश्वरी अध्याय 18 ओवी 3471½

अशी विश्वात्मक अनुभूती ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरी मधून येते. जसे वाचेला शोभादायक कवित्व आहे त्या कवित्वाला जशी सुरसत्तेची बहार असावी व या सुरसतेत ज्याप्रमाणे परमार्थ वर्णनाचा संबंध यावा असे कवित्वाचे वर्णन ज्ञानेश्वरीत येते.

ज्ञानेश्वरांनी संपूर्ण चैतन्यसृष्टीला अनुभूतीचा विषय कला आहे. "जैसे शारदियेचे चंद्रकळे । माजी अमतकण कोवळे । ते वेचिती मन मवाळे । चतोरतलगे ।। तियापरी श्रोता । अनुभवावी हे कथा । अति हळूवारपणे । चित्ता आणूनिया ।। हे शब्देविण संवादिजे । इंद्रिय नेणता भोगिजे । बोला आधी झोंबिजे । प्रमेयाशी ।। जैसे भ्रमर परागु नेती । परी कमळदळे नणती । तैसी परी आहे सेवेती । ग्रंथी इये ।। का आपुला ठावे न सांडिता । आलिंगिजे चंद्र प्रगटता । हा अनुराग भोगिता । कुमुदिनी जाणे ।।"[12]

¼ज्ञानेश्वरी अध्याय 1 ओवी 56,57,58,59,60½

ज्याप्रमाणे शरदऋतूच्या चंद्रकिरणातील अमृताचे कोमल कण चकोराची पिल्ले मृदू मनाने वेचतात त्याचप्रमाणे चित्त अगदी हळूवार करून श्रोत्यांनी ही कथा अनुभवावी हिची चर्चा शब्दावाचून करावी मातल्या मनात हिचा विचार करावा इंद्रियांना पत्ता लागू न देता हिचा उपभोग घ्यावा हिच्यात प्रतिवादित शब्दाच्या अगोदर त्यात सांगितलेल्या सिध्दांताचे आकलन करावे कमलातील पराग भुंगे घेऊन जातात कमळातील पाकळ्यांना त्याची खबरही नसते. या ग्रंथाचे सेवन करण्याची रीत तशी आहे किंवा चंद्र दिसू लागताच चंद्रविकासिनी कमलिनी प्रफुलीत होवून आपली जागा न सोडता त्याला आलिंगन देते हे प्रेमसौख्य कसे भोगावे तिचे तिलाच ठाऊक असते. या ओव्यामध्ये ज्ञानेश्वरांनी वेगवेगळ्या निसर्गप्रतिमा वापरून श्रोत्यांनी ही कथा अनुभवावी असे म्हटले आहे. चंद्र कमळ शरदऋतू अशा कितीतरी निसर्गप्रतिमा आलेल्या आहेत.

ज्ञानदेवांनी संपूर्ण चराचर विश्वातील प्रतिमा ज्ञानेश्वरीमध्ये घेतल्या आहे. ज्ञानदेवांची विश्वमोहिनी प्रतिभा निसर्गदर्शनातून आत्मसाक्षात्कार घडविते. अश्वत्थवृक्ष, क्षराक्षरविचार, विश्वरूपदर्शन, भक्तियोग, योगदुर्गाचे रूपक, मायानगरीचे रूपक, आसुरी संपत्ती, स्थितप्रज्ञ आणि योगभ्रष्ट आत्मज्ञान पसायदान यातून कितीतरी निसर्ग प्रतिमा आलेल्या आहेत.

ज्ञानदेवांनी सूर्याचे वर्णनही केले आहे, प्रकाश, तेज:पुजता, सूर्य, दिनकर अशा कितीतरी सूर्य प्रतिमा ज्ञानेश्वरीत येतात

"भानूचेनि तेजे धवळले । जैसे त्रैलोक्य दिसे उजळले ।।

तैसे व्यासमती कवळले । मिरवे विश्व ।।"[13]

¼ज्ञानेश्वरी अध्याय 1 ओवी 39½

"सूर्ये अधिष्ठिली प्राची । जगाराणीव दे प्रकाशाची । तैसी वाचा श्रोतया ज्ञानाची । दिवाळी करी ।।"[14]

¼ज्ञानेश्वरी अध्याय 15 ओवी 12½

अशा अनेकपदरी सूर्य ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी मध्ये रंगविला आहे.

अनेक कवींनी चंद्राच्या संवेदनशील प्रतिमा वापरलेल्या आहे. ज्ञानदेवांनी रंगविलेला सूर्य तेज:पुंज आहे तर चंद्र हळूवार कोवळा आहे.

"चंद्र तेथे चंद्रिका । शुभ तेथे अंबिका । संत तेथे विवेका । असणे की जी ।।"[15]

¼ज्ञानेश्वरी अध्याय 18 ओवी 1632½

चंद्र तेथे चांदणे असायचे शीव तेथे शक्ती असायचीच व संत तेथे सुविचार असायचाच तसेच चंद्रबिंब वाटोळे । देखोनि क्षिरसागर उचंबळे । आगा पुनवेच्या दिवशी । अशा कितीनी चंद्राच्या प्रतिमा आलेल्या आहेत.

तसेच ज्ञानेश्वरीत ज्ञानदेवांनी प्राणीसृष्टी, वृक्षराजी, कृमीकिटके, खडक, डोंगर, पर्वत, भूमीगत धन, बाहुल्याचे खेळ, शेतांची अवजारे, माणूस त्याचे कुटूंब, सामाजिक व्यवहार, सुष्टदुष्ट माणसाचे स्वभाव, पिकांची स्थितीगती, धान्यभोजन, पतीपत्नी, आईमूल, वक्ताश्रोता, भक्तइश्वर यांचे परस्परसंबध दाखविले आहे. कामधेनू, कल्पवृक्ष, कालकूट, अमृतधारा, चेतना, चिंतामणी अशा कितीतरी कवीकल्पना आल्या आहेत.

सागर सागराचे विशालपण, गांभीर्य, सागराला आलेला उधाण, पोर्णिमेला उसळणाऱ्या सागराच्या लाटा, वर्षाकाळची भरती, अमावस्येची ओहोटी, सागराचे विशालपण सागराची अथांगता, लाटांचे नृत्य

"समुद्र का वायुवसे । तरंगाकार उलसे । तो समुद्रास ऐसा दिसे । सानिवा जेवी ।।"[16]

¼ज्ञानेश्वरी अध्याय 15 ओवी 344½

समुद्र हा वायूच्या योगाने लाटांच्या आकाराने प्रकट होतो तो लाटांचा आकार जसा समुद्राचा लाहानसा अंश असा दिसतो अशा कितीतरी निसर्ग प्रतिमा ज्ञानेश्वरीत येतात.

"आकाश म्हणजे स्वर्गधरेच्या मीलनाचा साक्षिदार, सरोवर तरंगी सांडले असे ज्ञानदेव म्हणतात. गगने मुढी सुवाये, आकाश गवसावे, आकाश व अवकाश, आकाशी अभ्रपटल, परिभ्रमे, निचेष्टे आकाश, अभ्रे जिरती आकाशी, आकाशे सर्वत्र वसाये त्रिभुवन काजळी, गगनामाजी उधळली व्यापक आणि उदास जैसे का आकाश"[17] अशी अनेक वर्णने ज्ञानेश्वरीत येतात. वर्षाऋतू, वसंतऋतू, ग्रीष्मऋतू, शरदऋतू अशी अनेक वर्णने ज्ञानेश्वरीत येतात.

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायात पसायदान मागितले आहे त्यामध्येही अनेक निसर्गप्रतिमा आल्या आहे.

"आता विश्वात्मके देवे । येणे वागय ज्ञे तोषावें । तोषोनी मज द्यावे ।
पसायदान हे ।। जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो।
भूता परस्परे पडो । मैत्र जिवांचे ।। दुरितांचे तिमिर जावो । विश्व
स्वधर्म सूर्ये पाहो । जो जे वांछिल तो ते लाहो । प्रणिजात वर्षत
सकळ मंगळी । ईश्वर निष्ठांची मांदियाळी अनवरत भूमंडळी । भेटतू
भुतां।। चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणींचें गाव । बोलते ते
अर्णव पीयूषांचे ।। चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वाही
सदा सज्जन । सोयरे होतु ।। किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनी तिन्हीं
लोकी ।
भजिजो आदिपुरूखी । अखंडित ।। आणि ग्रंथोपजीविये । विशेषी लोकीं
इयें । दृष्टादृष्ट विजये । होआवे जी ।। येथ म्हणजे श्री विश्वेशराओ । हा
होईल दान पसावो । येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ।।"[18]

¼ज्ञानेश्वरी अध्याय 18 ओवी 1793 ते 1800½

"ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या शेवटी मागितलेले पसायदान म्हणजे 'ज्ञानेश्वरी'च्या उत्तुंग देवालयावरील कांचनांचा कळस आहे."[19] आज प्रत्येक माणसाला देवातील विश्वव्यापकपण समजले पाहिजे, आपल्या भारतीय संस्कृतीने मानवाला सृष्टीतील नानाविधरूपे बघायला शिविले आकाशातील चंद्र, सर्व तारे याची उपासना करायला सांगितले वृक्षात औदुंबर, पिंपळ, तुळस, पिंपळ, बेल यांना पवित्र मानले. पर्वतात हिमालयाला श्रेष्ठ मानले. नद्यांना पवित्र मानून त्याची पूजा केली. गाय, बैल, कोकिळा, नागोबा, यांची पूजा करायला सांगितली. पृथ्वीमधील सृष्टीमध्ये परमेश्वर पाहायला सांगितले तसेच ज्ञानदेवांनी निवृत्ती नाथांना परब्रम्ह मानले, गुरू मानले व पसायदान मागितले.

"आता विश्वात्मकु हा माझा । स्वामी श्री निवृत्ती राजा । तो अवधारू वाकपूजा
। ज्ञानदेवो म्हणे ।।"[20]

¼ज्ञानेश्वरी अध्याय 15 ओवी 598½

ज्ञानदेवांचे पसायदान ही एक विश्वप्रर्थना आहे याचे वैशिष्ट्य असे की ज्ञानदेवांनी पसायदानात स्वत: करिता काही मागितले नाही. जे काही मागितले ते विश्वातील प्राणिमात्रांसाठी ज्ञानदेवांनी समाज परिवर्तनाचे कार्य करायचे होते. सर्व समाजाच्या परिवर्तनाची चिंता त्यांना वाटत होती. ज्ञानदेवांनी पसायदानात काही मागणे मागितले ते असे की, दृष्टांचा दुष्टपणा नष्ट होवो, त्याच्या मनात सत्कर्मा विषयी आवड निर्माण होवो, भूत मात्रांचे एकमेकांशी मैत्र जडो, पापाचा अध:कार नष्ट होवो, स्वधर्मरूपी सूर्याचा उदय होवो, प्राणिमात्रांची इच्छापूर्ती होवो, संतांचा मांदियाळी निर्माण व्हावी, संत सर्वाचे नातलग व्हावे, त्रिभुवने सुखी होवोत, त्रैलोक्य आदिपुरूषाची भक्ती घडो, ग्रंथोपजीवी जनांना इहपरलोकी सुख लाभो जगात शांती निर्माण व्हावी शांत असलेली इश्वरनिष्ठ माणस सर्वांना भेटावी, दु:खी लोकांचे अंत:करण शुध्द व्हावे, इश्वर निष्ठाची मांदियाळी निर्माण व्हावी. याकरिता त्यांनी भक्तिमार्गाची शिकवण दिली ज्ञानदेवांनी या निसर्गाचा, जगाचा विचार केला.

"हे विश्वचि माझे घर । एसी मती जयाची स्थिर
किंबहुना चराचर । आपण जाहला"[21]

¼ज्ञानेश्वरी अध्याय 12 ओवी 213½

हे विश्वच माझे घर आहे असा तंचा दृढनिश्चय होता. आज विज्ञान युग असले आणि सगळी सुखे माणसाच्या पायाशी लोळत असली तरी त्याचे मन अस्थिर आहे. सत्कार्यात विघ्न आणण्याचा दुष्ट लोकांचा स्वभाव असतो. खळांच्या विकृत आणि दुष्ट स्वभावामुळे हिंसा, अनीती, स्वार्थ यांच्यात वाढ होते. माणूस स्वत:ही अप्रसंन्न असतो व दुसऱ्यांनाही अप्रसन्न ठेवतो. धार्मिक क्षेत्र असो, शैक्षणिक, व्यापारी, कलाकार,
सहकार, राजकारण अगदी सगळ्या क्षेत्रात दुष्ट लोक असतात. म्हणूनच ज्ञानेश्वरांनी सांगितलेली प्रार्थना आज समाजात रूजविण्याची गरज आहे. खळांची व्यंकटी सांडो दुष्ट लोकांच्या मनातला दुष्टपणा जाऊन त्याच्यामनात सत्कर्माविषयी आवड निर्माण झाली तर जग सुखी होईल.

पसायदानातून ज्ञानेश्वरांनी कल्पतरू, चिंतामणी, समुद्र, चंद्र, सूर्य अशा कितीतरी प्रतिमा वापरलेल्या आहे. अशा प्रकारे ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीत निसर्ग आणि पर्यावरण आले आहे.

आज प्रदुषणाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे वायुप्रदुषण, मृदाप्रदुषण, ध्वनीप्रदुषण, जलप्रदुषण या समस्या भेडसावत आहे. वाहनांचा धूर, कारखान्यातून निघणारे विषारी रसायन, झाडांची कटाई, प्लास्टीकचा प्रयोग, सिमेंटचे रस्ते व घरे यामुळे प्रदुषणाची समस्या निर्माण झाली आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. निसर्गापासून माणूस दूर जात आहे. म्हणून आज संतांच्या साहित्यातून जो निसर्ग दिसतो त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीतील निसर्गवर्णन वाचले तर मन प्रफुल्लित होते, म्हणून ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आजही वाचनीय आहे.

## समारोप

ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीतून अनेक निसर्गप्रतिमा येतात साहित्य संस्कृती आणि निसर्गाचा जवळचा संबंध आहे. संतानी आध्यात्मिक क्रांती केली, समाजप्रबोधन केले. सांस्कृतिक पर्यावरणाचा सुंदर नमुना म्हणजे पंढरीची वारी होय. आजही कितीतरी वारकरी आपल्या आवडत्या विठुरायाला भेटण्यासाठी पंढरपूरला जातात. ज्ञानेश्वरांनी निसर्गाच्या पर्यावरणात्मक स्वरूपात चैतन्यतत्व शोधले. व्यावहारिक जीवनाचे नाते निसर्गाशी जोडले. निसर्ग आणि मानव या नात्यातील अव्दैत ज्ञानेश्वरीत येते. निसर्गातील भव्यदिव्य रूप ज्ञानेश्वरीत येते. आत्मरूपाचे भव्यदिव्य दर्शनही त्यांना निसर्गातच घडते. ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीत अनेक निसर्गप्रतिमा येतात. विश्वातील प्राणीमात्रा सुखी व्हावेत असे ज्ञानदेवांना वाटते. ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीचा आणि निसर्गाचा जवळचा संबंध आहे. ज्ञानेश्वरीतील विचार समाजापर्यंत पोहचविले तर सर्वजगच सुखी होईल. आजही या ग्रंथची मानवाला गरज आहे.

## निष्कर्ष

1- ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीमध्ये अनेक निसर्गप्रतिमा आल्या आहेत. ज्ञानेश्वरीचा आणि पर्यावरणाचा जवळचा संबंध आहे.

2- संतसाहित्य हे मूल्यात्मक साहित्य असून त्यामध्ये तत्कालिन समाजाचे व पर्यावरणाचे प्रतिबिंब पडले आहे.

3- ज्ञानेश्वरांनी निसर्गाच्या पर्यावरणात्मक स्वरूपात चैतन्यतत्व शोधले.

4- मानव आणि निसर्ग यांचे अतुट नाते ज्ञानेश्वरीमध्ये आहे.

5- आत्मरूपाचे विराट दर्शन ज्ञानेश्वरांना निसर्गातून घडते आणि त्यांना विश्वचैतन्याचा साक्षात्कार होतो.

## संदर्भ टिपा

1- मालविका देखणे - 'पर्यावरण कथा' ज्ञानेश प्रकाशन, नागपूर, 2009 पृ.क्र. 5

2- विठठ ल घारपुरे - 'पर्यावरण भूगोलशास्त्र' पिपळापुरे अँन्ड कंपनी, प्रथम आवृत्ती, 1999 पृ.क्र. 3

3- श्रीकांत कार्लेकर - 'प्राकृतिक भूगोल आणि भूरूपशास्त्र' डायमंड पब्लिकेशन, पुणे 2014 पृ.क्र. 3

4- उषा माधव देशमुख - 'ज्ञानेश्वरी : विलसिते', ज्ञानेश प्रकाशन, नागपूर 2005 पृ.क्र. 80

5- रा. चि. ढेरे - लोक संस्कृतीचे उपासक, पुणे, 1964 पृ.क्र. 140

6- रा. चि. ढेरे - 'संत साहित्य आणि लोकसाहित्य काही अनुबंध' श्रीविद्या प्रकाशन, पुणे 1978 पृ.क्र. 15

7- उषा माधव देशमुख - 'ज्ञानेश्वरी : विलसिते', ज्ञानेश प्रकाशन, नागपूर 2005 पृ.क्र. 82

8- तत्रैव - पृ.क्र. 82

9- तत्रैव - पृ.क्र. 83

10- तत्रैव - पृ.क्र. 83

11- श. वा. दांडेकर - 'ज्ञानेश्वरी', स्वानंद प्रकाशन, आळंदी, पाचवी आवृत्ती, 1972 पृ.क्र. 712

12- तत्रैव - पृ.क्र. 10

13- तत्रैव - पृ.क्र. 08

14- तत्रैव - पृ.क्र. 541

15- तत्रैव - पृ.क्र. 814

16- तत्रैव - पृ.क्र. 566

17- उषा माधव देशमुख - 'ज्ञानेश्वरी : विलसिते', ज्ञानेश प्रकाशन, नागपूर 2005 पृ.क्र. 86

18- श. वा. दांडेकर - 'ज्ञानेश्वरी', स्वानंद प्रकाशन, आळंदी, पाचवी आवृत्ती, 1972 पृ.क्र. 824

19- ल. रा. नसिराबादकर - 'प्राचिन मराठी वाङमयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, दहावी आवृत्ती, 2013 पृ.क्र. 67

20- श. वा. दांडेकर - 'ज्ञानेश्वरी', स्वानंद प्रकाशन, आळंदी, पाचवी आवृत्ती, 1972 पृ.क्र. 590 21. तत्रैव - पृ.क्र. 404

**संदर्भ ग्रंथ सूची**


1- कार्लेकर श्रीकांत - 'प्राकृतिक भूगोल आणि भूरूपशास्त्र' डायमंड पब्लिकेशन, पुणे 2014

2- घारपुरे विठ्ठल - 'पर्यावरण भूगोलशास्त्र' पिपळापुरे अँन्ड कंपनी, प्रथम आवृत्ती, 1999

3- ढेरे रा. चि. ढेरे - लोक संस्कृतीचे उपासक, पुणे, 1964

4- ढेरे रा. चि. - 'संत साहित्य आणि लोकसाहित्य काही अनुबंध' श्रीविद्या प्रकाशन, पुणे 1978

5- देशमुख उषा माधव - 'ज्ञानेश्वरी : विलसिते', ज्ञानेश प्रकाशन, नागपूर 2005

6- देखणे मालविका - 'पर्यावरण कथा' ज्ञानेश प्रकाशन, नागपूर, 2009

7- दांडेकर श. वा. - 'ज्ञानेश्वरी', स्वानंद प्रकाशन, आळंदी, पाचवी आवृत्ती, 1972

8- नसिराबादकर ल. रा. - 'प्राचिन मराठी वाङमयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, दहावी आवृत्ती, 2013

9- लोंढे श्रीहरी महाराज - 'पसायदान' पुष्पाबाई लोंढे, पानसवाडी, 2002